# भगतसिंह जनअधिकार यात्रा

**12 मार्च 2023 - 14 एप्रिल 2023**

## बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि जनतेच्या लुटीच्या विरोधात!

### रोजगार, शिक्षण, आरोग्य, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!





"लोकांना एकमेकांशी लढण्यापासून रोखण्यासाठी वर्ग जाणिवेची गरज आहे. गरीब कामगार-कष्टकरी आणि शेतकऱ्यांना स्पष्टपणे समजवून दिले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, त्यामुळे तुम्ही त्यांच्या षडयंत्रापासून स्वतःला वाचवले पाहिजे आणि त्यांच्या हाताला लागून काहीही करता काम नये. जगातील सर्व गरिबांचे, मग ते कुठल्याही जातीचे, रंगाचे, धर्माचे किंवा देशाचे असोत, त्यांचे अधिकार एक आहेत. तुमचे भले यातच आहे की तुम्ही धर्म, रंग, वंश आणि राष्ट्र व देशाचे भेदभाव सोडून एकजूट व्हा आणि सरकारची ताकद आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करा. याने तुमचे नुकसान होणार नाही, यामुळे तुमच्या बेड्या गळून पडतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल."

- शहीद भगतसिंह (सांप्रदायिक दंगली व त्यावरील उपाय)

## इंकलाब जिंदाबाद!

# भगतसिंह जनअधिकार यात्रा तुमच्यामध्ये का?

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि**

**आणि जनतेच्या लुटीच्या विरोधात !**

**रोजगार, शिक्षण, आरोग्य-व्यवस्था, आवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

BSJAY

BHAGAT SINGH JAN ADHIKAR YATRA

सहयोग मूल्य: 10 रु.

जर जनतेच्या शक्तीवर विश्वास असेल, तर आपण निराश होण्याची गरज नाही. जनतेच्या दुर्दम्य शक्तीने फॅसिझमच्या काळ्या ढगांमध्ये आशेच्या वीजेचा संचार केला आहे. तीच अमोघ शक्ती आपल्या भविष्याची हमी आहे.

— राहुल सांकृत्यायन



भगतसिंह जनअधिकार यात्रा
मार्च 2023
प्रकाशक: परमेश्वर जाधव
मुद्रणस्थळ: आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे-411030
सहयोग मूल्य: रु. 10/-

*जर एखादे सरकार जनतेला तिच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवत असेल तर अशा सरकारला बदलवणे किंवा समाप्त करणे हा जनतेचा केवळ अधिकारच नव्हे तर कर्तव्य बनून जाते.*

*— शहीदे आज़म भगतसिंह*

साथींनो,

आपण एका अशा काळात जगत आहोत जेव्हा देशातील जनता वाढती बेरोजगारी, महागाई, आवाक्याबाहेर चाललेले शिक्षण आणि आरोग्य यासारख्या समस्यांशी झगडत आहे. तरुणांची मोठी लोकसंख्या निराशेला बळी पडत आहे. विद्यार्थी-कर्मचारी-कामगारांसह सर्वसामान्य जनतेचा प्रत्येक घटक भाजप सरकारच्या फॅसिस्ट हल्ल्याचा बळी होत आहे, आणि रोजगाराच्या संधी, पेन्शन-भत्ते यासारख्या सुविधा, व श्रम कायद्यांमध्ये बदलांच्या मार्गाने प्रत्येक प्रकारची सामाजिक-आर्थिक सुरक्षितता सुद्धा हिरावून घेतली जात आहे.

एका बाजूला महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, गरिबी, भूक आणि शोषणाने सामान्य कामगार कष्टकरी जनतेचे कंबरडे मोडले आहे तर दुसरीकडे तिला धार्मिक उन्मादाच्या लाटेत ढकलले जात आहे; जेणेकरून जनतेला तिच्या जीवनाच्या खऱ्या मुद्द्यांपासून भरकटवले जाऊ शकेल. जनतेसमोर जनतेतीलच एका भागाला नकली शत्रू म्हणून पुढे केले जात आहे जेणेकरून आपण आपल्या खऱ्या शत्रूला ओळखूच नये. **इंग्रजांच्या 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाला सध्याचे सरकार पूर्ण निष्ठेने लागू करत आहे.**

हे काम पार पाडण्यासाठी सध्याच्या सरकारला संपूर्ण मीडिया कसोशीने मदत करत आहे. यामुळेच आपल्या जीवनातील रोजगार, महागाई, शिक्षण यांसारखे खरे प्रश्न सर्व माध्यमांच्या चर्चेत गायब आहेत आणि मंदिर-मशिद, हिंदू-मुस्लीम, जातीयवाद,

अंधराष्ट्रवाद यांवर निर्लज्जपणे गप्पा मारल्या जात आहेत; जेणेकरून गैरलागू मुद्द्यांना मुद्दा बनवून जनतेला भरकटवता येईल. **याचे कारण म्हणजे, संपूर्ण मीडियाच खुद्द मोठमोठ्या भांडवलदारांच्या हाती आहे.**

स्वातंत्र्याच्या 75 वर्षात भाजपपासून काँग्रेस, सपा, बसपा, राजद, जेडीयू, आप या सर्व पक्षांना संधी देऊन त्यांचे खरे रूप जनतेने पाहिले आहे. मोठमोठे धनदांडगे, श्रीमंत, मालकवर्ग, ठेकेदार, मोठे दुकानदार, बिल्डर, धनिक शेतकरी आणि सर्व प्रकारच्या धनपशूंचे संपत्तीचे मनोरे देशातील सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या अश्रूंच्या सागराच्या मधोमध आणखी उंचच उंच होत चालले आहेत. ना 'अच्छे दिन' येत आहेत आणि ना 'गरिबी दूर' होत आहे.

भाजपच्या मोदी सरकारने तर परजीवी धनदांडगे व श्रीमंतांची सेवा करण्याचे, भांडवलदारांची तिजोरी भरण्याचे आणि भ्रष्टाचाराचे आतापर्यंतच्या सर्व सरकारांचे रेकॉर्ड तोडले आहेत. हे सर्व जनतेला धर्म आणि अंधराष्ट्रवादाच्या उन्मादात आणि नशेत वाहवून केले जात आहे.

काँग्रेसची सरकारे हेच काम पूर्वी वेगळ्या पद्धतीने करत होती. हे लक्षात ठेवले पाहिजे की देशात खाजगीकरणाची लहर चालवून जनतेच्या पैशाने उभ्या असलेल्या सार्वजनिक उपक्रमांना आधी योजनाबद्ध पद्धतीने वाईट बनवण्याचे आणि नंतर कवडीमोल भावात भांडवलदारांना सोपविण्याचे काम काँग्रेस सरकारनेच सुरू केले होते. भाजप सरकार त्याच धोरणांना आणखी तीव्रपणे, अधिक दमनकारी पद्धतीने, धार्मिक उन्माद भडकावून आणि हुकूमशाही पद्धतीने लागू करत आहे आणि याचमुळे अडाणी-अंबानी, टाटा-बिर्ला इत्यादींचा आवडता पक्ष बनला आहे.

आम आदमी पक्ष, समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष, राष्ट्रीय जनता दल, जनता दल (यू), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, अकाली दल, द्रमुक, अन्नाद्रमुक, वायएसआर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस इत्यादी विविध छोट्या आणि प्रादेशिक पक्षांनीही दाखवले हेच आहे की तेसुद्धा आपापल्या राज्यांतील व प्रदेशांतील धनदांडगे, श्रीमंत शेतकरी, कंत्राटदार, दलाल, मध्यस्थ, बिल्डर इत्यादींची आपापल्या पद्धतीने सेवा करण्याचे आणि त्यांना सामान्य जनतेला लुटण्याचे पूर्ण स्वातंत्र्य व सोय देण्याचेच काम करतात. हे पक्षही धर्म आणि जातीच्या नावावर आपापल्या पद्धतीने जनतेत फूट पाडून आपले राजकारण साध्य करतात. **हे आपण आपल्या अनुभवावरून जाणतोच.**

स्वतःला कामगार कष्टकरी जनतेचे प्रतिनिधी म्हणवणाऱ्या सीपीआय, सीपीएम,

सीपीआय-एमएल (लिबरेशन) सारख्या पक्षांची अवस्थाही हीच आहे की कधी ते काँग्रेसचे शेपूट पकडतात तर कधी इतर निवडणूकबाज पक्षांचे. ते मुख्यतः मोठे भांडवलदार आणि श्रीमंतांऐवजी मुख्यतः छोटे-मध्यम भांडवलदार व श्रीमंतांची सेवा करण्यात लागलेले आहेत आणि भाजप व काँग्रेस सारख्या मोठ्या भांडवलदारांच्या पक्षांच्या तुलनेत यांच्यात एवढाच फरक आहे.

थोडक्यात, सध्याच्या व्यवस्थेत देशातील कोट्यवधी कामगार, विद्यार्थी, युवक, कर्मचारी, गरीब शेतकरी यांच्यासाठी कुठलाच पर्याय नाहीये.

अशा परिस्थितीत आम्हाला भगतसिंहाचे हे शब्द नेहमी आठवतात :

**"जेव्हा गतिरोधाची परिस्थिती लोकांना आपल्या कवेत घेते तेव्हा ते कोणताही बदल घडवण्यास कचरतात. हे जडत्व आणि निष्क्रियता मोडून काढण्यासाठी क्रांतिकारी भावना निर्माण करणे आवश्यक असते, अन्यथा अध:पतन आणि विध्वंसाचे वातावरण निर्माण होते. लोकांची दिशाभूल करणाऱ्या प्रतिगामी शक्ती जनतेला चुकीच्या मार्गावर नेण्यात यशस्वी होतात. यामुळे माणसाची प्रगती थांबते आणि गतिरोध निर्माण होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी क्रांतीचे चैतन्य जागवणे आवश्यक आहे, जेणेकरून मानवतेच्या आत्म्यात खळबळ निर्माण होईल."**

या गतिरोधाच्या परिस्थितीला बदलण्यासाठी आणि क्रांतीची भावना जागी करण्यासाठी आम्ही तुमच्यामध्ये **"भगतसिंह जनअधिकार यात्रा"** घेऊन आलो आहोत. आम्ही तुम्हाला हा विश्वास देण्यासाठी आलो आहोत की आजही देशातील सर्वसामान्य कष्टकरी जनतेने सर्व प्रकारच्या अत्याचाराला व अन्यायाला आपले नशीब मानून नतमस्तक होण्याचे मान्य केलेले नाही. आम्ही हे सांगायला आलो आहोत की अनेक संवेदनशील आणि न्यायप्रेमी तरुण आजही भगतसिंह आणि क्रांतिकारकांच्या विचारांची मशाल घेऊन सर्व प्रकारचा जातीयवाद, धार्मिक कट्टरतावाद, अंधराष्ट्रवादी उन्माद यांच्या विरोधात परिवर्तनाच्या लढ्यात गुंतलेले आहेत. आम्ही ही आठवण करून द्यायला आलो आहोत की मोठ्यात मोठ्या रात्रीनंतर सकाळ ही येतच असते.

**भगतसिंह जनअधिकार यात्रेचे उद्दिष्ट** देशातील जनतेला आपल्या मूलभूत अधिकारांबाबत जागृत करणे, सचेतन करणे आणि ते मिळविण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करणे हे आहे. **भगतसिंह जनअधिकार यात्रेचे उद्दिष्ट** जनतेला या सत्याशी ज्ञात करवणे आहे की रोजगार, सर्वांना मोफत व समान शिक्षण, सर्वांना मोफत, समान व दर्जेदार उपचार, सर्वांना घर, प्रत्येक नागरिकाचा सरकारी विमा आणि खऱ्या अर्थाने

एक धर्मनिरपेक्ष राज्य हे आमचे मूलभूत अधिकार आहेत. जर एखादे सरकार आम्हाला हे मूलभूत अधिकार देत नसेल तर अशा सरकारला राहण्याचा काही अधिकार नाही. एखादी व्यवस्था आम्हाला हे अधिकार देत नसेल तर ती व्यवस्था टिकून राहण्याचे काहीही औचित्य नाही. **भगतसिंह जनअधिकार यात्रेचे उद्दिष्ट** समाजात एक नवीन क्रांतिकारी जागृती आणणे आहे. **भगतसिंह जनअधिकार यात्रेचे उद्दिष्ट** हे सत्य उघड करणे आहे की जर जनतेने आपल्या खऱ्या मुद्द्यांना घेऊन एकजूट होऊन संघर्ष सुरु केला तर ती आपले अधिकार मिळवू शकते, ती जग बदलू शकते, इतिहास रचू शकते. **आज आपले हे खरे मुद्दे काय आहेत?**

## शिक्षण आणि रोजगार! आमचा जन्मसिद्ध अधिकार!

आज देशातील तरुण वर्ग बेरोजगारीच्या भीषण संकटाचा सामना करत आहे. दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देण्याचे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या मोदी सरकारच्या कार्यकाळात देशातील सुमारे **32 कोटी लोकसंख्या** बेरोजगारीच्या दरीत ढकलली गेली आहे. सी.एम.आय.आय. (सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी) च्या आकडेवारीनुसार सध्या देशातील बेरोजगारीचा दर वाढत जाऊन कोविडच्या काळातील पातळीपर्यंत पोहोचला आहे. हीच आकडेवारी सांगते की कोविडच्या काळात बेरोजगार झालेल्या प्रत्येक पाच तरुणांपैकी एका तरुणाला आजपर्यंत रोजगार मिळू शकलेला नाही. ज्यांच्याकडे रोजगार आहे त्यांच्यापर्यंत सुद्धा मंदीची झळ पोहोचली आहे, आणि अनेक नामांकित कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांची कपात सुरू केली आहे. ही कपात किती प्रमाणात होत आहे हे यावरून समजले जाऊ शकते की भारतात ट्विटरने आपल्या 80 टक्के कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. अलीकडेच अमेझॉनने 18,000 आणि एच.पी. ने 6,000 हून अधिक कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचे जाहीर केले आहे. जुलै 2022 पासून मायक्रोसॉफ्टने तीन वेळा आणि नेटफ्लिक्सने दोनदा नोकरकपात केली आहे. हार्ड ड्राइव्ह निर्माता कंपनी सीगेटने 3,000 हून अधिक लोकांना कामावरून काढून टाकले आहे.

वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये केली गेलेली कपात पुढील तक्त्यामध्ये समजू शकते.

| कंपनी | कपात (टक्क्यांमध्ये) |
|---|---|
| ट्विटर | 50 |
| क्राइकें | 30 |
| कैमिओ | 25 |
| रॉबिनहूड | 23 |
| इंटेल | 20 |
| स्नॅपचॅट | 20 |
| क्वाईनबेस | 18 |
| ओपेनडोर | 18 |
| मेटा | 15 |
| स्ट्राइप | 14 |
| शॉपीफाय | 10 |

ही तर सर्वोच्च आणि श्रीमंत कंपन्यांची स्थिती आहे. **संपूर्ण देशातील सर्व कारखाने, कार्यालये-दुकाने, वर्कशॉप्स इत्यादींची हीच स्थिती आहे.** नरेंद्र मोदींनी लोकांच्या मजबुरीची खिल्ली उडवण्याची परिसीमा तर ही आहे की जेव्हा रोजगार न मिळाल्यामुळे कोणी रस्त्यावर दुकान लावतो, भजी तळतो, तेव्हा त्याला रोजगाराचे नाव दिले जाते! **रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेले अपयश लपवण्यासाठी मोदी सरकारकडून अशा हास्यास्पद गोष्टी बोलल्या जातात. सत्य हे आहे की सर्व बेरोजगार मरत नाहीत किंवा आत्महत्या करत नाहीत. ते हात-पाय काम हलवतात आणि मजबुरीने रस्त्यावर स्टॉल्स लावतात, पाणीपुरीचे दुकान लावतात, फेरीवाले बनतात आणि कसे तरी उपासमारीच्या सीमारेषेवर जगतात; पण सरकार निर्लज्जपणे म्हणते की हा तर रोजगार आहे! हा रोजगार नाही, आमची मजबुरी आहे, ज्याची मोदी सरकार खिल्ली उडवत आहे.**

सरकारची प्रचारक बनलेली मीडिया-यंत्रणा निर्लज्जपणे विकासाचे आणि प्रगतीचे दावे करत आहे, पण सत्य हे आहे की ही प्रगती केवळ बेरोजगारांच्या संख्येत होत आहे, हा विकास केवळ सामान्य जनतेच्या उद्ध्वस्त होण्यात होत आहे. **काहीतरी कारण असावे की मोदी सरकार आता 'अच्छे दिन' चे नावसुद्धा काढत नाही!**

गेल्या 9 वर्षात मोदी सरकारने सरकारी क्षेत्रातील उरलेल्या रोजगाराच्या संधीही संपवल्या आहेत. रेल्वे, बँक, वीज, पाटबंधारे यासह असा एकही विभाग नाही ज्याला आज उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या धोरणांचा फटका बसलेला नाही. परिस्थिती अशी आहे की, देशातील सर्वाधिक रोजगार निर्मिती विभाग असलेल्या रेल्वेमध्ये गेल्या सात वर्षांत दीड लाखांहून अधिक पदे रद्द करण्यात आली असून, उर्वरित मंजूर पदांपैकी तीन लाखांहून अधिक पदे रिक्त आहेत. इतर विभागांचीही तीच अवस्था आहे. जुलै 2022 मध्ये केंद्रीय कार्मिक राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत सांगितले की, मोदी सरकारच्या 8 वर्षांच्या कार्यकाळात सुमारे 22 कोटी लोकांनी नोकऱ्यांसाठी अर्ज केले होते, त्यापैकी केवळ 7.22 लाख लोकांनाच नोकऱ्या मिळाल्या. एवढेच नव्हे तर लष्करात 'अग्निवीर' या नावाने कंत्राटी पद्धतीने सैनिक भरती करण्याची योजना आखल्यानंतर आता सर्व बँकांसहित अन्य विभागातही हाच प्रयोग करण्याचे काम सुरू आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की देशभक्ती आणि "राष्ट्रवादा" चा ढोल बडवणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप सरकार ठेकेदारी पद्धतीने सैनिक भरती करून कष्टकरी-शेतकऱ्यांच्या मुलामुलींच्या हक्कावर हल्ला करीत आहेत. कारगिल युद्धात मारल्या गेलेल्या सैनिकांसाठी शवपेटी खरेदी करण्यात केलेल्या घोटाळ्यापासून तर 'अग्नीवीर' अंतर्गत ठेकेदारी पद्धतीने सैनिक भरती करण्यापर्यंत नरेंद्र मोदी आणि भाजपाची देशभक्ती व "राष्ट्रवादा"ची सत्यता जनतेच्या समोर आहे. ज्यांना इतिहास माहित आहे, ते तर जाणतातच की स्वातंत्र्याच्या लढाईच्या काळापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देशप्रेमासोबत काहीही घेणेदेणे नव्हते. **जे इंग्रजांना माहिती पुरवत होते, माफीनामे लिहीत होते आणि शहीद भगतसिंह यांच्या शहादतीला निरुपयोगी म्हणत होते, आणि धर्माच्या नावाखाली लोकांची एकजूट तोडण्याचे काम करत होते, त्यांच्या "देशभक्ती" आणि "राष्ट्रवादा"च्या बडबडीवर आज विश्वास केला जाऊ शकतो का?**

खाली दिलेल्या तक्त्यावरून, विविध सरकारी नोकऱ्यांमधील पदांची संख्या आणि त्यासाठी आलेल्या अर्जांच्या संख्येच्या आधारे देशातील बेरोजगारीची स्थिती काय आहे, याचा अंदाज येऊ शकतो!

| विभाग | पद | अर्ज |
|---|---|---|
| रेल्वे | 90,000 | 2,80,00,000 |
| महाराष्ट्र पोलीस शिपाई | 1137 | 2,00,000 |

| | | |
|---|---|---|
| राजस्थान वि.स. सचिवालय | 18 | 18,000 |
| जिल्हा न्यायालय, देवास (चतुर्थ श्रेणी) | 34 | 8000 |
| पश्चिम बंगाल (ग्रुप डी) | 6000 | 25,00,000 |

भीक मागणे आणि पकोडे यालासुद्धा रोजगार म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या या "रामराज्यात" प्रत्यक्षात रोजगाराच्या संधी कशा कमी झाल्या आहेत, याचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की पूर्वी दरवर्षी भरती करणाऱ्या विभागांमध्ये 2012 ते 2022 या कालावधीत भरतींची संख्या तीव्रतेने कमी झालेली आहे. ज्या नोकरभरती झाल्यात, त्यातही बहुतांश जण भ्रष्टाचार, पेपरफुटी आणि हेराफेरीला बळी पडले आहेत.

देशात रोजगार असलेल्या लोकसंख्येमध्येही मोठी लोकसंख्या असंघटित क्षेत्रात कार्यरत आहे. या लोकसंख्येसाठी कुठलेही कामगार कायदे किंवा इतर कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा नाही. पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे ऑफ इंडिया, 2021 नुसार देशात सुमारे **दहा कोटी रोजंदारी कामगार** आणि सुमारे **पाच कोटी पगारदार कामगार** कोणत्याही लेखी कराराशिवाय काम करत आहेत. नियमित स्वरूपाची बहुतांश कामे नियमित कामगारांच्या ऐवजी आउटसोर्सिंगद्वारे केली जात आहेत. 2004 पासून आउटसोर्स कामगारांच्या संख्येत 40% वाढ झाली आहे. **मोदी सरकारने ठेकेदारी प्रथेला चालना देण्यात काँग्रेससहित अन्य सर्व पक्षांच्या सरकारांचे रेकॉर्ड मागे टाकले आहेत.**

बेरोजगारांना स्वयंरोजगार देण्याच्या आणि स्टार्टअप अथवा मेक इन इंडियाच्या भुलथापेचे सत्य हे आहे की **भारतातील 95 टक्के स्टार्टअप वर्षभरही टिकत नाहीत. उरलेल्या स्टार्टअप्सपैकी 85 टक्क्यांचे मासिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे.**

खरे तर देशातील हे रोजगाराचे संकट न सोडवता येण्यासारखे नाही. हा काही भूकंप नव्हे ज्यावर मनुष्याचे नियंत्रण नसते! मूठभर मालकवर्ग, धनी व्यापारी, ठेकेदार, धनिक शेतकरी इत्यादींच्या नफ्यावर आधारलेल्या असमान विकासाच्या मॉडेलमुळे आज देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन अंधारात ढकलले गेले आहे. जर संपूर्ण देशपातळीवर खेड्यापाड्यात रुग्णालये, शाळा, परिवहन इत्यादी मूलभूत गरजांवरच

काम झाले तर लोकांच्या सुखसुविधा तर वाढतीलच, पण या प्रक्रियेत करोडो नोकऱ्याही निर्माण होतील. अनेक उच्चशिक्षितांना सुद्धा असे वाटते की यासाठी संसाधने कोठून येतील. परंतु जर आपण पैसा आणि संसाधनांबद्दल बोललो तर विविधतेने नटलेल्या या देशात पैसा किंवा संसाधनांची अजिबात कमतरता नाही. गेल्या दहा वर्षांत देशातील भांडवलदार घराण्यांना बेलआउट पॅकेज आणि करातील सुटच्या स्वरूपात 2.10 लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत. भांडवलदार वर्ग आणि नेते-मंत्री-नोकरशहा यांच्या उधळपट्टी आणि अमर्याद सुविधांना आळा घातला, तर देशात पैसा आणि संसाधनांची कमतरता भासणार नाही.

**त्याचप्रमाणे शिक्षणाबद्दल बोलायचे झाले तर प्राथमिक शिक्षण असो की उच्च शिक्षण, दोन्ही आज विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहेत.**

प्राथमिक शिक्षणाची स्थिती अशी आहे की, सरकारने नुकत्याच लोकसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार **देशातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची 9,07,583 पदे रिक्त आहेत.** नवोदय आणि केंद्रीय विद्यालयातही तीच परिस्थिती आहे. केंद्रीय व नवोदय विद्यालयातसुद्धा विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकांची मंजूर पदे आधीच कमी होती. या मंजूर पदांपैकी 40 टक्के पदे रिक्त आहेत. **मुबलक संख्येने बेरोजगार शिक्षक पदव्या घेऊन रस्त्यावर फिरत असतांना भरती का केली जात नाही?** शिक्षणाच्या खाजगीकरणाला चालना देण्यासाठी सरकारी यंत्रणा उद्ध्वस्त करण्यात आली आहे. या विध्वंसाच्या जोरावर भरभराट होत असलेल्या खाजगी शाळा खरे तर शॉपिंग मॉल्स आहेत, जिथून तुम्ही तुमच्या स्थितीनुसार स्वस्त किंवा महागडे शिक्षण खरेदी करू शकता.

उच्च शिक्षणाबद्दल बोलायचे झाले तर देशभरातील केंद्रीय आणि राज्य विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांची **दोन तृतीयांश पदे रिक्त आहेत.** या सरकारी विद्यापीठांमध्ये स्वयंअर्थसहाय्यित (सेल्फ फायनान्स्ड) अभ्यासक्रमांना चालना देण्याच्या नावाखाली त्यांना खासगीकरणाकडे ढकलले जात आहे. अतिथी (गेस्ट) किंवा अनौपचारिक शिक्षकांच्या आधारे बहुतांश वर्ग चालवले जात असून कायम नियुक्त्या सातत्याने कमी होत आहेत. डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचे स्वप्न आता काही मोजक्या श्रीमंतांचेच राहिले आहे. खासगी विद्यापीठांमध्ये परिस्थिती अशी आहे की जिंदल, अशोका सारखी खाजगी विद्यापीठे बी.ए. करण्यासाठीच दरवर्षी लाखो रुपये घेतात. अशा परिस्थितीत मोठी लोकसंख्या कशीबशी 10वी-12वी उत्तीर्ण होऊन कुठेतरी आयटीआय-पॉलिटेक्निकसारख्या पदविका अभ्यासक्रमात प्रवेश घेते

किंवा खासगी महाविद्यालयातून पदवी घेऊन दिल्ली, मुंबई, पंजाब, हरियाणा येथील औद्योगिक क्षेत्रात हाडतोड मेहनत करायला जाते.

मोदी सरकारने आणलेल्या **नवीन शैक्षणिक धोरणामुळे** शिक्षणाचे खाजगीकरण-भगवेकरणाची प्रक्रिया अनेक पटींनी वाढणार आहे. हे नवीन शैक्षणिक धोरण शिक्षण क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक कमी करण्यासाठी आणि शिक्षणाला खाजगी कंपन्यांसाठी विक्रीयोग्य वस्तू बनवण्याचे दरवाजे उघडत आहे. हे नवीन शिक्षण धोरण सहाव्या इयत्तेपासूनच मुलांना काम-धंदा शिकवून, आयटीआय, पॉलिटेक्निक आणि स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांना चालना देऊन भांडवलदारांसाठी स्वस्त मजुरांची फौज तयार करेल आणि ज्यांना नोकरी मिळणार नाही ते "भजी तळतील". यापूर्वीही परिस्थिती अशी होती की सरकारच्या धोरणांना बळी पडून विद्यार्थी आणि तरुणांची मोठी लोकसंख्या उच्च शिक्षणापूर्वीच शिक्षणापासून दूर फेकली जात होती. आकडेवारीनुसार, केवळ 12% विद्यार्थीच उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकतात. त्यातही दलित, अल्पसंख्याक आणि महिलांबद्दल बोलायचे तर त्यांची संख्या आणखी कमी आहे. हे नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्यानंतर ही परिस्थिती आणखी भयावह होणार आहे. त्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर दोन वर्षांतच परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की सर्व विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांना स्वत:च्या खर्चाचा काही भाग स्वतःच उभा करण्यास सांगितले आहे आणि त्यामुळे देशभरातील विद्यापीठांमध्ये फी वाढ सुरू लागली आहे. गेल्या वर्षीच दिल्ली विद्यापीठ, अलाहाबाद विद्यापीठ, गोरखपूर विद्यापीठ, बनारस हिंदू विद्यापीठ इत्यादींनी फी वाढवली आहे. जसजसे हे धोरण लागू होत जाईल तसतसे सर्वसामान्य विद्यार्थी आणि शिक्षण यांच्यात उभी असलेली पैशाची भिंत अधिक उंच होईल.

## मोदी सरकार = महागाईचा मार!

मोदी सरकारच्या आठ वर्षाच्या काळात जनतेने तीव्र महागाईचा सामना केला आहे. वाढत्या किमतींमुळे देशातील कष्टकरी लोकांचे जगणे कठीण झाले आहे. मोदी सरकारचे मंत्री आणि टिव्ही चॅनेल्सने वाढत्या महागाईवर निर्लज्ज विधाने करून सर्वसामान्य जनतेच्या त्रासाची जी चेष्टा चालवली ती कुणी कशी विसरू शकेल? "बहुत हुई महंगाई की मार, अबकी बार मोदी सरकार" असा नारा देत सत्तेवर आलेल्या मोदी सरकारच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत कांद्याच्या वाढत्या किमतीवर बोलताना निर्लज्जपणे मी कांदा खात नाही, असे उत्तर दिले. त्याचप्रमाणे दलाल

प्रसारमाध्यमे "पाकिस्तानातील महागाई" या विषयावर कार्यक्रमांचे आयोजन करून जनतेच्या समस्यांची खिल्ली उडवतात. भांडवलदारांची सेवा करणाऱ्या या राजकारणी आणि मंत्र्यांना महागाई, बेरोजगारीचा मार सहन करत असलेल्या जनतेच्या वेदना, दु:ख कधीच जाणवू शकत नाही, हे उघड आहे.

आज डिझेल-पेट्रोल, स्वयंपाकाचा गॅस, घरभाड्यापासून ते पीठ, भाजीपाला या सर्वच वस्तूंच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. देशातील मोठी श्रमिक लोकसंख्या कोणत्या स्थितीत राहते याचा अंदाज ऑक्सफॅमच्या नुकत्याच आलेल्या अहवालावरून लावता येईल, ज्यामध्ये म्हटले आहे की, देशातील सर्वात वरच्या 1 टक्के लोकांकडे देशाच्या एकूण संपत्तीपैकी 40 टक्के संपत्ती आहे, तर खालच्या 50 टक्के लोकांकडे फक्त 3 टक्के आहे. देशातील तीन चतुर्थांश लोक दररोज 30 ते 40 रुपयांवर जगतात. 2012 मध्ये नॅशनल न्यूट्रिशन मॉनिटरिंग ब्युरोने केलेल्या शेवटच्या सर्वेक्षणात हे समोर आले होते की 1979 च्या तुलनेत 2012 मध्ये प्रत्येक गावकऱ्याला सरासरी 550 कॅलरी ऊर्जा, 13 ग्रॅम प्रथिने, 5 मिलीग्राम लोह, 250 मिलीग्राम कॅल्शियम आणि 500 मिलीग्राम व्हिटॅमिन ए प्रतिदिन कमी मिळत होते. गेल्या 10 वर्षात किमती वाढल्यानंतर हे आकडे आणखीच भयावह झाले असतील याचा अंदाज लावता येतो. ऑक्टोबर 2022 मध्ये प्रसिद्ध झालेल्या जागतिक भूक निर्देशांकाच्या (ग्लोबल हंगर इंडेक्स) अहवालानुसार भुकेच्या बाबतीत भारत जगातील 114 देशांपैकी 107 व्या क्रमांकावर आहे आणि त्याची स्थिती आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक गरीब देशांपेक्षा वाईट आहे. वास्तवात, मोदी सरकारचे "विकासाचे" सर्व विक्रम या कष्टकरी लोकसंख्येच्या विनाशाच्या बळावर बनवले जात आहेत.

| **वस्तू** | **2014** | **2022** |
|---|---|---|
| गॅस सिलेंडर | 410 | 1050 |
| पेट्रोल | 70 | 100 |
| डिझेल | 55 | 90 |
| तीळाचे तेल | 90 | 200 |
| दूध | 35 | 60 |

**महागाई वाढण्याचे कारण आहे व्यापक कष्टकरी जनतेच्या सरासरी उत्पन्नात झालेली प्रचंड घट, भांडवलदार वर्गाला दिल्या जाणाऱ्या प्रचंड सवलती, साठेबाजी-सट्टेबाजी, प्रचंड अप्रत्यक्ष कर आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेची अराजकता.** खरं

तर, बहुतेक वस्तू आणि सेवा आता कमी श्रमात तयार केल्या जात आहेत कारण श्रमाची उत्पादकता पूर्वीपेक्षा जास्त आहे. या अर्थाने त्यांचे वास्तविक मूल्य पूर्वीपेक्षा कमी झाले आहे. परंतु व्यापक जनतेचे सरासरी उत्पन्न भांडवलदार वर्गाने चलनवाढ आणि इतर मार्गांनी आणखी झपाट्याने कमी केल्यामुळे, सर्व व्यापारी, कमिशन एजंट, दलाल यांनी प्रत्येक संकटाच्या वेळी जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी व सट्टेबाजी केल्यामुळे, अप्रत्यक्ष करांचा बोजा सतत वाढत गेल्यामुळे आणि नफाकेंद्रित अराजक व्यवस्थेत सामाजिक गरजेनुसार नियोजित उत्पादन शक्य नसल्यामुळे व्यापक कष्टकरी सामान्य जनतेला अभूतपूर्व महागाईचा सामना करावा लागत आहे. **आपण पाहू शकतो की महागाई ही नियंत्रण करणे शक्य नसलेली नैसर्गिक आपत्ती नसून सध्याच्या नफा-केंद्रित व्यवस्थेचे ते नैसर्गिक फळ आहे.**

## मोदी सरकारच्या काळात भ्रष्टाचाराचे सर्व विक्रम झाले ध्वस्त

सत्तेत येण्यापूर्वी अच्छे दिन आणू, भ्रष्टाचार संपवू, काळा पैसा परत आणू अशा गप्पा मारणाऱ्या भाजपने निवडणुका संपताच या मुद्द्यांना निर्लज्जपणे निवडणुकीसाठीच्या भूलथापा (जुमले) म्हणून घोषित केलं होतं. भ्रष्टाचार आणि काळा पैसा निर्मूलनाच्या नावाखाली भाजप सरकारने नोटाबंदीपासून जीएसटीपर्यंत उचललेल्या सर्व पावलांचा फायदा देशातील श्रीमंतांनाच झाला आहे, आणि वास्तवात सर्वसामान्यांच्या वाट्याला हालअपेष्टाच आल्या आहेत. **नुकतेच हिंडेनबर्ग खुलाशानंतर गौतम अदानी यांनी भाजपच्या कार्यकाळात भ्रष्टाचार करून जी गडगंज संपत्ती एकत्रित केली आहे त्यावरून भाजप सरकारचा खरा चेहरा उघड झाला आहे.** यासोबतच त्यांच्या "देशभक्ती"ची आणि "राष्ट्रवादा"चीही पोलखोल झाली. अमेरिकन 'एक्टिविस्ट शॉर्ट सेलर' संस्था हिंडेनबर्गने आपल्या अहवालात तथ्ये आणि आकडेवारी देऊन खुलासा केला आहे की अदानीने अतिशय कमी काळात जे भांडवलाचे साम्राज्य उभे केले आहे त्यामागे दशकांपासून शेअर्सच्या किमती आणि हिशोबाच्या पुस्तकांमध्ये हेराफेरी, विदेशी 'टॅक्स हेवन' मध्ये आपल्या परिवारातील सदस्यांद्वारे संचालित खोट्या शेल कंपन्यांद्वारे आपल्याच पैशाला आपल्याच कंपनीत परत गुंतवून त्याच्या शेअरच्या किंमती वाढवणे आणि हे शेअरचे चढे भाव दाखवून देशातील आणि जगातील सर्वच वित्तीय संस्थांकडून भरमसाठ कर्ज घेणे अशी सर्व हेराफेरी काम करत होती. **अदानीच्या संपत्तीचा हा डोंगर उभारण्यात एलआयसी सारख्या सार्वजनिक कंपन्या आणि एसबीआय, पीएनबी सारख्या बँकांमध्ये जनतेने**

**जमा केलेले पैसेही झोकून दिले गेले आहेत, जे सरकारच्या आश्वासनानंतरही बुडू शकतात. भ्रष्टाचाराचा हा सारा डोंगर सरकारच्या सहकार्याशिवाय उभा राहू शकत नाही, हे उघड आहे. कधी मोदी अदानींच्या विमानात, तर कधी अदानी मोदींच्या विमानात उगीचच फिरताना दिसत नाहीत.**

हिंडेनबर्गच्या खुलाशानंतर अदानींनी स्वतःचा बचाव करताना "राष्ट्रवादा"चा मुखवटा धारण केला आणि याला देश आणि "राष्ट्रा"वरील हल्ला म्हणायला सुरुवात केली हे विनाकारण नव्हे. मोदी सरकारसाठी हे स्वाभाविकच आहे कारण त्यांच्यासाठी देशाचा अर्थ अदानी, अंबानी, टाटा-बिर्ला हाच आहे! जेव्हाही ते "देशाचा विकास" किंवा "राष्ट्राचा विकास" म्हणतील तेव्हा तुम्ही त्याला "अदानी-अंबानी-टाटा-बिर्लाचा विकास" असेच ऐका कारण त्यांचा हाच अर्थ असतो. परंतु आपण हे जाणतो की **देश काही केवळ कागदावर बनलेला नकाशा नाही तर तो त्यात राहणाऱ्या कामगार-कष्टकऱ्यांचा मिळून बनतो जे देशातील सर्व संपत्ती तयार करतात.**

भाजप सरकारच्या पहिल्या कार्यकाळात **राफेल खरेदीच्या** नावाखाली मोठा भ्रष्टाचार करण्यात आला, त्यात राफेल विमाने 2012 पासून दसॉल्ट एव्हिएशनशी केलेल्या करारापेक्षा तिप्पट किमतीत खरेदी करण्यात आली आणि या खरेदीत सरकारी कंपनी एचएएल ऐवजी अंबानी यांच्या कंपनीला भागीदार करण्यात आले. या भ्रष्टाचारावर प्रश्न उपस्थित होताच सरकारने पुन्हा 'देशाच्या सुरक्षेचा' युक्तिवाद केला. वास्तवात भांडवलदार वर्ग आणि त्यांच्या प्रतिनिधी सरकारांसाठी देश किंवा राष्ट्राचा अर्थ केवळ देशातील भांडवलदारच असतात, जे देशातील जनतेचे श्रम पिळून आणि देशाची नैसर्गिक संपत्ती आणि संसाधने शोषून 'राष्ट्राचा विकास' करतात.

अशाचप्रकारे कोविड महामारीच्या वेळी जेव्हा देशातील सर्वसामान्य कष्टकरी लोक भयंकर संकटाचा सामना करत होते, आरोग्य व्यवस्थेची असमर्थता उघडी पडली होती, मोठी लोकसंख्या रस्त्यावर होती, त्याच वेळी पंतप्रधान मोदींनी आपत्तीचे संधीत रुपांतर करण्याचा नारा दिला आणि **पीएम केअर्स फंडाची** घोषणा केली. या निधीसाठी ना केवळ लोकांनाच देणगी देण्याचे आवाहन केले तर महसूल विभागाने त्यांच्या हाताखालील सर्व कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार कापून या निधीत जमा करण्यास सांगितले. नंतर सरकारने कोर्टाला सांगितले की पीएम केअर्स ही सरकारी संस्था नसून एक खाजगी ट्रस्ट आहे ज्यावर सरकारचा काही अधिकार नाही. **हा भ्रष्टाचार नाही तर आणखी काय आहे?**

उत्तर प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र आणि बिहार पासून विविध

राज्यातील आणि केंद्राच्या भरती परीक्षांनी भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांच्या बाबतीत नवा विक्रम केला आहे. पेपरफुटी, हेराफेरी आणि भ्रष्टाचारामुळे तरुणांना वर्षानुवर्षे कोर्टात जावे लागले नसेल, अशी एकही परीक्षा झालेली नाही. या घोटाळ्यांची यादी तयार केली तर शेकडो पाने भरतील, परंतु यादी संपणार नाही. भाजप आणि सर्व राज्यांतील भांडवली सरकारे भ्रष्टाचारात आकंठ बुडालेली आहेत. यापूर्वीसुद्धा बंगारू लक्ष्मणने घेतलेली लाच, कारगिल शवपेटी घोटाळा, मध्यप्रदेशातील व्यापम घोटाळा यांनी वेळोवेळी नैतिकता-संस्कृतीचा जप करणाऱ्या भाजप आणि संघ परिवाराची सत्यता दाखवून दाखवून दिली आहे. **हे घोटाळे भाजप सरकारचे चारित्र्य आणि चेहरा उघड करण्यासाठी पुरेसे आहेत.**

## जाती-धर्माचे झगडे सोडा! खऱ्या लढ्याशी नाते जोडा!

खरे तर देश स्वतंत्र झाल्यापासूनच सर्व निवडणूकबाज पक्षांनी बनावट धर्मनिरपेक्षता आणि जातीय-धार्मिक समीकरणांच्या आधारे लोकांमध्ये फूट पाडण्याचे आणि मतांचे ध्रुवीकरण करण्याचे काम केले, परंतु फॅसिस्ट भाजप सत्तेवर आल्यानंतर प्रत्येक प्रकारची तार्किकता, लोकशाही आणि वैज्ञानिक विचार गाडून टाकून जनतेच्या त्या हिश्श्याला जातीय-धार्मिक-अंधराष्ट्रवादी माथेफिरुंच्या गर्दीत बदलण्याची मोहीम चालवली जात आहे जो सामाजिक-आर्थिक अनिश्चितता व असुरक्षिततेत जगत आहे, जो ना पूर्णपणे वसलेला आहे आणि ना पूर्णपणे बरबाद, म्हणजे मध्यमवर्ग, निम्न-मध्यमवर्ग आणि अर्ध-कामगार लोकसंख्या. परिस्थिती ही आहे की दलित, अल्पसंख्याक किंवा महिला असणे हाच गुन्हा झाला आहे, ज्यांना एक नकली शत्रू म्हणून लोकांसमोर प्रस्तुत केले जात आहे जेणेकरून असली शत्रू दिसू नये. देशात दर तासाला महिलाविरोधी गुन्ह्यांचे 49 खटले दाखल होत आहेत. एनसीआरबी (NCRB) अहवालानुसार 2020 मध्ये देशात एकूण 28,046 बलात्काराच्या घटना नोंदवण्यात आल्या होत्या, तर 2021 मध्ये ही संख्या 31,677 पर्यंत वाढली आहे.

**एकीकडे शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या संधी संपवून सर्वसामान्यांच्या हितावर चौफेर हल्ले केले जात आहेत आणि दुसरीकडे या हल्ल्यांविरोधात एकजूट होऊ नये म्हणून इंग्रजांप्रमाणेच 'फोडा आणि राज्य करा'चे धोरण अवलंबले जात आहे.**

एनसीआरबी (NCRB) च्या मागील अहवालानुसार देशात दर तासाला दलितांविरुद्ध अत्याचाराचे सहा गुन्हे नोंदवले जातात. यामध्ये उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश ही राज्ये आघाडीवर आहेत जिथे जाती-आधारित गुन्ह्यांच्या

घटना वाढत आहेत. देशात जेव्हा अमृतकाळाची घोषणा होत होती, त्याचवेळी राजस्थानमधील जालोर येथे इंद्र मेघवाल या इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या दलित विद्यार्थ्याला पिण्याच्या भांड्याला हात लावल्याबद्दल बेदम मारहाण करून हत्या करण्यात आली. याच “अमृतकाळात” आयआयटी मुंबईमध्ये जातीय छळाला कंटाळून एका दलित विद्यार्थ्याने आत्महत्या केली. याआधीही रोहित वेमुला पासून तर पायल तडवीपर्यंत संस्थात्मक हत्यांची एक मालिकाच आहे, जिला फॅसिस्ट भाजपने पोसलेल्या जातीय अहंकाराच्या मानसिकतेने घडवून आणले आहे. गुजरातमधील उना येथे दलित तरुणाच्या बेदम मारहाणीपासून ते अलाहाबादमधील दलित कुटुंबाच्या हत्येपर्यंत जघन्य गुन्हे या व्यवस्थेत नेहमीचे झाले आहेत. अशा प्रत्येक घटनेनंतर अस्मितेच्या राजकारणाचे झेंडे वाहणारे आपल्या अस्मितेच्या राजकारणाचा झेंडा घेऊन रस्त्यावर उतरतात आणि जाती निर्मूलनाच्या दिशेने पुढे जाण्याऐवजी जातीय अस्मिता मजबूत करण्याचे आणि समाजात जातीय विभागणी अधिक कठोर करण्याचे राजकारण करत ते शेवटी भाजप आणि संघ परिवाराच्या फॅसिस्ट राजकारणाला बळ देतात.

**“ ...लोकांना एकमेकांशी लढण्यापासून रोखण्यासाठी वर्ग जाणिवेची गरज आहे. गरीब कामगार-कष्टकरी आणि शेतकऱ्यांना स्पष्टपणे समजवून दिले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, त्यामुळे तुम्ही त्यांच्या षडयंत्रापासून स्वतःला वाचवले पाहिजे आणि त्यांच्या हाताला लागून काहीही करता काम नये. जगातील सर्व गरिबांचे, मग ते कुठल्याही जातीचे, रंगाचे, धर्माचे किंवा देशाचे असोत, त्यांचे अधिकार एक आहेत. तुमचे भले यातच आहे की तुम्ही धर्म, रंग, वंश आणि राष्ट्र व देशाचे भेदभाव सोडून एकजूट व्हा आणि सरकारची ताकद आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करा. याने तुमचे नुकसान होणार नाही, यामुळे तुमच्या बेड्या गळून पडतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल.**



**-शहीद भगतसिंह (धार्मिक दंगली व त्यावरील उपाय)**

**संघ परिवार आणि भाजपने संपूर्ण देशात जो 'हिंदू-मुस्लिम द्वेषाचा खेळ' सुरु केला आहे त्याचा परिणाम म्हणजे आज संपूर्ण समाजात धार्मिक कट्टरता आणि उन्मादाचे वातावरण निर्माण झाले आहे.** हा उन्माद कायम ठेवण्यासाठी भाजप सरकारने एनआरसी-सीएए (NRC-CAA) सारख्या षडयंत्रापासून तर अयोध्या, काशी, मथुरा इत्यादी प्रकरणे आणि लव्ह जिहाद, हिजाब आदी मुद्यांचा भडीमार चालवला आहे. भाजप सत्तेत आल्यानंतर मॉब लिंचिंगसारख्या घटना वेगाने वाढल्या आहेत. 2022 मध्ये लोकसभेत आकडेवारीबद्दल विचारले असता, सरकारने सांगितले की सरकार आणि त्यांच्या संस्था मॉब लिंचिंगची आकडेवारीच ठेवत नाहीत.

एवढेच नाही तर मोठ्या सांप्रदायिक दंगलींसोबतच द्वेषपूर्ण मुद्द्यांना भडकावून स्थानिक पातळीवर तणाव आणि दंगली घडवण्याचा प्रकार देशभर सुरू आहे. एनसीआरबी (NCRB)च्या आकडेवारीनुसार 2014 ते 2020 दरम्यान भारतात धार्मिक दंगलीच्या 5000 हून अधिक घटनांची नोंद झाली. याच्या परिणामी संपूर्ण देशाच्या पातळीवर हिंदू-मुस्लिम लोकसंख्येमध्ये भयंकर दुरावा निर्माण झाला आहे. भाजप आणि संघ परिवाराच्या या धार्मिक कट्टरतावादी राजकारणाचा थेट फायदा पीएफआय आणि ओवेसी सारख्यांच्या धार्मिक अतिरेकी राजकारण करणाऱ्या पक्षांना होत आहे. **वास्तवात एक कट्टरपंथ दुसऱ्या कट्टरपंथाला उभारी देऊन आणि त्याचा पूरक म्हणूनच स्वतःला टिकवून ठेवू शकतो.**

**अशा परिस्थितीत आम्ही तुम्हाला विचारू इच्छितो: प्रत्येक दंगलीचा फायदा शेवटी कोणाला होतो? दंगलींमध्ये कधी कोणत्या नेत्या-मंत्र्याचे, भांडवलदाराचे, नोकरशहाचे किंवा अधिकाऱ्याचे घर जळाले का किंवा त्यांची मुले दंगलीत मरतात का? जरा शोध घ्या धार्मिक उन्माद पसरवणाऱ्या नेत्यांची मुले-मुली कोणत्या परदेशी विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत आहेत? जरा विचार करा की आपल्या मुला-मुलींच्या हातात त्रिशूल आणि तलवार देऊन त्यांना आपल्याच गरीब कष्टकरी बांधवांवर हल्ला करायला सांगणाऱ्यांची मुलं किती ऐशोआरामात जगत आहेत?**

**मित्रांनो, आता वेळ आलेली आहे आपण धर्माच्या नावावर मूर्ख बनणे बंद करण्याची. आणि हे समजून घ्या की कष्ट करणाऱ्या लोकांचा एक वर्ग आहे आणि इतरांच्या कष्टाची मलाई लाटणाऱ्यांचा एक दुसरा वर्ग आहे, अन्यथा येणारा काळ आपल्यासाठी भयंकर असेल. याव्यतिरिक्त कुठल्याही विभागणीचा आपल्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय जीवनाशी काहीही संबंध नाही. कोणत्याही धर्माचे पालन करणे किंवा न करणे ही प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे**

**हे आपण समजून घेतले पाहिजे. या धर्माला आपल्या सार्वजनिक जीवनात आणल्यानेच सर्व भांडणे, दंगलीं निर्माण होतात, ज्याचा फायदा नेहमीच श्रीमंतांना होतो आणि गरीबांनाच त्यात आपले जीवन आणि संपत्ती गमवावी लागते, मग ते हिंदू असोत, मुस्लिम असोत, शीख असोत, ख्रिश्चन असोत वा अन्य कोणीही. तुम्ही स्वतःला विचारा, तुम्हाला कळेल की हेच सत्य आहे.**

आज भारतासह संपूर्ण जगाचा भांडवलदार वर्ग गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे: भांडवलदार वर्गाच्या नफ्याच्या घसरत्या सरासरी दराचे संकट. भांडवलदार वर्गाची व्यवस्थापकीय समिती म्हणून काम करणारी सरकारे त्यांचा हाच नफ्याचा दर वाढवण्यासाठी जनतेच्या सर्व सोयी-सुविधा कमी करत आहेत. शिक्षण आणि आरोग्य यासारख्या आवश्यक गोष्टींपासून हात काढून घेऊन त्या बाजाराला सोपवणे, जनतेच्या कष्टाच्या पैशातून उभारलेले सार्वजनिक क्षेत्र भांडवलदारांच्या हवाली करणे, सर्व कामगार कायदे आणि पर्यावरण संरक्षण कायदे रद्द करून भांडवलदारांना लूट करण्याची अधिकाधिक अधिक सवलत देणे, कर्मचाऱ्यांची पेन्शन, भत्ते इत्यादी रद्द करून जनतेच्या कष्टाच्या पैशातून भांडवलदारांना बेलआउट पॅकेज देणे हे सर्व खरेतर वाढत्या संकटाचा परिणाम आहे.

**याच्या परिणामी वाढणाऱ्या असंतोषाला थोपवण्यासाठीच जातीयवादी-धर्मांध-अंधराष्ट्रवादी वातावरण तयार केले जात आहे, जेणेकरून लोकांनी त्यांच्या खऱ्या प्रश्नांवर एकजूट होऊ नये.** याआधीही काँग्रेसपासून ते इतर पक्षांच्या सरकारांनी भांडवलदार वर्गाचीच सेवा केली आहे, पण आज वाढत्या संकटाच्या काळात भांडवलदार वर्गाची सेवा करण्याचे आणि जनतेचा असंतोष वळवण्याचे काम ज्या कुशलतेने फॅसिस्ट भाजप आणि संघ परिवार करत आहे तसे इतर कोणताही पक्ष करू शकत नाही. याच कारणामुळे मृदू हिंदुत्वाच्या राजकारणापासून तर जातीय समीकरणे आणि 'सोशल इंजिनीअरिंग'चे राजकारण करणाऱ्या सर्व पक्षांना बाजूला सारून भांडवलदार वर्गाने भाजप आणि संघ परिवारासाठी आपल्या तिजोऱ्या खुल्या केल्या आहेत. एडीआरच्या एका अहवालानुसार, 2021-22 मध्ये भाजपला 614 कोटी 53 लाख रुपयांच्या देणग्या मिळाल्या, जेव्हाकी काँग्रेसला 95 कोटी रुपये मिळाले. इतर पक्षांना मिळणाऱ्या देणग्यासुध्दा भाजपला भांडवलदारांकडून मिळालेल्या देणग्यांच्या तुलनेत नगण्य आहेत. भाजपच्या सध्याच्या ताकदीमागे सर्वात महत्वाचा पैलू भांडवलदार, ठेकेदार, दलाल, बिल्डर, धनी दुकानदार इत्यादींचे हे समर्थनच आहे. **जो ज्याचे खातो, त्याचाच आदेश ऐकतो. त्यामुळे स्पष्ट आहे की भाजप आणि हे**

**सर्व पक्ष त्यांचीच सेवा करतील ज्यांच्या पैशाच्या बळावर ते चालत आहेत. आपण या गोष्टीला जेवढे लवकर समजून घेऊ तेवढे चांगले.**

## हवेशिवाय ना पान हलते, लढल्याशिवाय ना काही मिळते!

मित्र-मैत्रिणींनो, देशाची सद्यस्थिती जोरजोरात ओरडून सांगत आहे की, स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही समता आणि न्यायावर आधारित त्या समाजाची उभारणी झालेली नाही, ज्याचे स्वप्न शहीद भगतसिंह आणि त्यांच्या साथीदारांनी पाहिले होते. भगतसिंह म्हणाले होते **"काँग्रेसच्या लढ्याचा शेवट कुठल्या ना कुठल्या तडजोडीत किंवा अपयशात होईल. त्याचा परिणाम हा होईल की गोरे साहेब जातील आणि सावळे साहेब राज्य करतील". त्यांनी लिहिले की भारत सरकारचा प्रमुख लॉर्ड रिडींग ऐवजी जर पुरुषोत्तमदास ठाकूर असतील तर त्यामुळे जनतेच्या जीवनात काय फरक पडणार आहे?** आज आपण काँग्रेस ऐवजी 'सर्व धनदांडग्यांचे पक्ष' असे लिहिले तर शहीद भगतसिंह यांचे हे वाक्य अतिशय प्रासंगिक होऊन जाते.

आज या क्रांतिकारी हुतात्म्यांचे हे स्वप्न प्रश्नाच्या स्वरूपात आपल्यासमोर उभे आहे. त्यांनी सुरू केलेला लढा शेवटपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपली आहे.

**सुरुवात कुठून करावी?** हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. आपल्याला सुरुवात करावी लागेल आपल्या दररोजच्या जीवनापासून. आपल्या मूलभूत अधिकारांपासून. जनतेचे मूलभूत हक्क हिरावून घेणाऱ्या सरकारला उखडून टाकणे हे जनतेचे कर्तव्य आहे, असे भगतसिंह म्हणाले होते. जर आम्हाला शिक्षण, रोजगार, वैद्यकीय सुविधा, निवास, सामाजिक-आर्थिक सुरक्षितता, लोकशाही हक्क, खरी धर्मनिरपेक्षता आणि लोकाभिमुख संस्कृती आणि मूल्ये देण्यास सध्याचे सरकार आणि व्यवस्था अपयशी ठरली असेल, तर ती हटवून नवीन लोकाभिमुख व्यवस्थेचे निर्माण करावे लागेल ज्यात उत्पादन, शासनतंत्र आणि समाजाच्या संपूर्ण संरचनेवर उत्पादन करणाऱ्या कष्टकरी लोकांचे नियंत्रण असेल, आणि निर्णय घेण्याची शक्ती कष्टकरी लोकांच्या लोकस्वराज्य पंचायतींच्या हातात असेल. **हे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे.** या दूरगामी उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठीची सुरुवात आपल्या या हक्कांसाठी विद्यमान सरकार आणि व्यवस्थेशी संघटित आणि एकजूट संघर्षाने करावी लागेल. या संघर्षासाठी जनतेला जागृत करण्यासाठी **भगतसिंह जनअधिकार यात्रा** काढण्यात येत आहे. या यात्रेअंतर्गत आम्ही काही महत्त्वाच्या मागण्या मांडत आहोत, त्याबाबत जनतेचे प्रबोधन करत आहोत, त्यासाठी लढण्यासाठी जनतेला संघटित करत आहोत.

ही यात्रा अनेक टप्प्यांत काढण्यात येणार असून, त्याअंतर्गत यात्रेचे पथक गावोगावी, शहरा-शहरात जाऊन जनतेमध्ये एक नवीन क्रांतीची प्रेरणा जागवेल. यामध्ये तुमचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. ही तुमची यात्रा आहे, तुमच्या हक्कांसाठी आहे.

## आमच्या मागण्या

1. रोजगार हा मूलभूत अधिकार म्हणून संविधानात समाविष्ट केला पाहिजे. **भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (BSNEGA)** संसदेत पारित करा, ज्या अंतर्गत सर्व काम करण्यायोग्य नागरिकांना नोकरी देणे सरकारची जबाबदारी असेल आणि नोकरी देऊ शकत नसेल तर किमान रु. 10,000 बेरोजगारी भत्ता दर महिना द्यावा लागेल. सर्व राज्य सरकारांनी आपापल्या विधानसभांमध्ये असा रोजगार हमी कायदा मंजूर करावा. जो सत्ताधारी पक्ष याला विरोध करेल तो स्पष्टपणे जनविरोधी आहे.

तात्कालिकरित्या **सर्व रिक्त सरकारी पदांवर भरती** करावी, त्यासाठी आवश्यक परिक्षांचे आयोजन केले जावे, सार्वजनिक उपक्रमांचे **खाजगीकरण थांबवावे** आणि देशाच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा निर्माण, गृहनिर्माण इ. सुविधांच्या विस्तारासाठी **नवीन जागा काढून त्यांत भरती केली जावी. 'अग्निविर' योजना त्वरित रद्द करावी. जुनी पेन्शन योजना पूर्ववत करावी.**

2. सर्व **कामगार कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी** करावी. ग्रामीण कामगारांना श्रम कायद्यांच्या कक्षेत आणले जावे. नवीन प्रस्तावित कामगार संहिता रद्द करण्यात याव्यात. **8 तास कामाचा दिवस, साप्ताहिक सुट्टी, दुप्पट दराने ओव्हरटाईम, युनियन बनवण्याचा अधिकार, सुरक्षेच्या तरतुदींचा अधिकार** खात्रीने दिला जावा, **अनौपचारिक क्षेत्रातील कारखाने सरकारी नियमांतर्गत आणले जावेत, नियमित स्वरूपाच्या कामांवरील कंत्राटी पद्धती रद्द करण्यात यावी,** आणि कामगार कायद्यांच्या उल्लंघनास फौजदारी श्रेणीत आणून दंडनीय बनवावे.

3. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी **साठेबाजी, वायदा व्यापार आणि सट्टेबाजीवर बंदी** घालण्यासाठी कायदा बनवला जावा, ज्याद्वारे हे दंडनीय गुन्हे घोषित केले जावेत, **मूलभूत वस्तू आणि सेवांच्या वितरण प्रणालीचे राष्ट्रीयीकरण** केले जावे आणि सरकारने त्याला पूर्णपणे आपल्या हातात घ्यावे, खाद्यान्नाच्या किमती वाढवणारी हमीभावाची व्यवस्था बंद करावी, सरकारी खरेदीसाठी सरासरी

नफा निश्चित करणारी किंमत निर्धारित केली जावी आणि या खरेदी व्यवस्थेपर्यंत गरीब आणि अल्पभूधारक शेतकरी पोहोचू शकतील याची हमी दिली जावी, **सार्वजनिक वितरण प्रणालीला** सार्वत्रिक बनवून सर्व नागरिकांना अन्न उपलब्ध केले जावे.

महागाई कमी करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे **अप्रत्यक्ष कर पूर्णपणे काढून टाकले जावेत आणि संपत्तीच्या आधारावर प्रगतीशील प्रत्यक्ष कर प्रणाली मजबूत केली जावी.** आम्ही कामगार-कष्टकरी लोकांनी या देशात संपत्ती निर्माण करण्यात आमच्या मेहनतीने आधीच योगदान दिलेले असते. सरकार अप्रत्यक्ष कराच्या माध्यमातून आपली लूट करते. जर अप्रत्यक्ष कर नसतील तर पेट्रोल-डिझेल-स्वयंपाकाचा गॅस इत्यादींच्या किंमती लगेच अर्ध्या किंवा एक तृतीयांश एवढ्या कमी होतील आणि प्रत्येक जीवनावश्यक वस्तू आणि सेवा स्वस्त होतील. परंतु मोदी सरकार आणि त्याआधीची काँग्रेस सरकारे सातत्याने प्रत्यक्ष कर कमी करत आहेत, ज्याचा फायदा श्रीमंतांना होत आहे आणि अप्रत्यक्ष कर वाढवत आहेत, ज्यामुळे गरिबांचे सर्वाधिक नुकसान होत आहे.

4. **शिक्षण हा मूलभूत अधिकार म्हणून संविधानात समाविष्ट केला जावा. लोकविरोधी नवीन शैक्षणिक धोरण–2020 रद्द करावे.** प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व नागरिकांना समान व मोफत शिक्षण देण्यात यावे आणि शिक्षणाचे खाजगीकरण समाप्त केले जावे. शिक्षणाला शारीरिक श्रमासोबत जोडले जावे, त्यात लष्करी प्रशिक्षण सक्तीचे केले जावे, शिक्षण वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध बनवले जावे आणि त्याला पूर्णपणे लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष स्वरूप दिले जावे.

5. 'सर्वधर्म समभाव' या बनावट धर्मनिरपेक्षतेच्या जागी, **खरे धर्मनिरपेक्ष राज्य** स्थापित करण्यासाठी एक कायदा आणला जावा, ज्याच्या अंतर्गत **कोणत्याही राजकीय नेत्याकडून सार्वजनिक जीवनात कोणत्याही धर्माचा, समुदायाचा किंवा श्रद्धेचा कोणत्याही स्वरूपात उल्लेख करणे, त्याचा वापर करणे हा दंडनीय गुन्हा ठरेल.** सरकारने स्वतःला सर्व धार्मिक कार्यापासून पूर्णपणे अलिप्त करावे, मग ते कोणत्याही धर्माचे असो. सर्व शाळा, महाविद्यालये, सरकारी विभाग इत्यादींमध्ये कोणत्याही धर्माचे प्रतीक, चिन्हे किंवा प्रार्थनांना बंदी घालावी.

6. केवळ अस्पृश्यताच नव्हे तर **कोणत्याही प्रकाराने किंवा कुठल्याही**

**स्वरूपातील जातीय भेदभाव हा दंडनीय गुन्हा म्हणून घोषित करण्यासाठी संविधानात दुरुस्ती केली जावी.** जातीच्या आधारावर संघटना बनवणे, संस्था निर्माण करणे, विवाहविषयक जाहिराती देणे इत्यादींवर पूर्ण बंदी असावी.

7. निवडणुकांमधील सर्व पक्ष आणि सरकारद्वारे होणाऱ्या भ्रष्टाचारावर बंदी घालण्यात यावी आणि त्यासाठी जनतेने निवडलेल्या लोकसमित्यांच्या देखरेखीत **सार्वजनिक लेखापरीक्षण आणि चौकशीची** व्यवस्था करण्यात यावी. सर्व तपास आणि देखरेख संस्थांना सरकारच्या नियंत्रणाबाहेर आणून त्यांचे उत्तरदायित्व या लोकसमित्यांप्रती निश्चित केले जावे.

8. सर्व नागरिकांना **घराचा मूलभूत हक्क** दिला जावा. यासाठी एक विशेष कायदा बनवला जावा आणि सरकारी घरांची एक सार्वत्रिक व्यवस्था निर्माण केली जावी, जिथे घरांच्या खरेदी-विक्रीवर, मालमत्तेच्या खरेदी-विक्रीमध्ये सट्टेबाजीवर पूर्ण बंदी असावी.

9. स्त्री-पुरुषांना समान कामाला समान वेतनासाठी कठोर कायदा करण्यात यावा. महिलांसोबतचा सर्व प्रकारचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक भेदभाव संपवण्यासाठी आवश्यक कठोर कायदे केले जावेत. अर्थातच, हे विसरता कामा नये की, संपूर्ण सामाजिक-आर्थिक संरचना बदलल्याशिवाय केवळ कायद्याने लैंगिक असमानता संपवता येणार नाही.

10. गरीब आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी (2 हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेले) **बियाणे, खते, वीज इत्यादींवर अनुदानाची योग्य व्यवस्था करण्यासाठी श्रीमंत वर्गावर विशेष कर लादण्यात यावा.** त्यांच्यासाठी **सिंचनाच्या व्यवस्थेचे व्यापक जाळे** निर्माण करण्याची जबाबदारी सरकारने घ्यावी आणि त्यांच्यासाठी सुलभ अटी आणि कमी व्याजदर असणाऱ्या **संस्थात्मक कर्जाची** व्यवस्था करावी जेणेकरून ते श्रीमंत शेतकरी, आडते, व्यापारी, सावकार इत्यादींकडून जास्त दराने कर्ज घेण्याच्या सक्तीपासून मुक्त होतील. तात्कालीकरित्या, **मनरेगा योजनेंतर्गत** वाटप वाढवावे, त्याअंतर्गत पूर्ण वर्षभरासाठी रोजगाराचा अधिकार द्यावा आणि कमीत कमी ठरलेल्या किमान मजुरीएवढ्या रकमेचे वाटप करावे.

11. धार्मिक आणि जातीय शत्रुत्व भडकावणे, हिंसाचार आणि 'मॉब लिंचिंग' इत्यादींमध्ये सहभागी असलेल्या सर्व प्रकारच्या संघटना, पक्ष इत्यादींवर बंदी घालावी, त्यांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित करून त्यांच्या नेत्या-

कार्यकर्त्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

## चला, नवीन सुरुवात करूया...

मित्र-मैत्रिणींनो, वरील मागण्या पूर्ण होऊ शकत नाहीत किंवा त्या अशक्य आहेत हे राज्यकर्त्यांनी आपल्या मनात बिंबवले आहे. आपणही ते पुन्हा पुन्हा सांगितले गेल्याने यावर विश्वास ठेवतो. **वरील जबाबदाऱ्या जर सरकार घेऊ शकत नसेल तर ते आहेच कशासाठी? फक्त गरिबांना लुटण्याची खुली सूट आणि व्यवस्था श्रीमंतांना देण्यासाठी, जेणेकरून श्रीमंत अधिक श्रीमंत होतील आणि गरीब अधिक गरीब होतील?**

**वास्तवात वरीलपैकी अनेक अधिकार जगातील विविध देशांतील लोकांना मिळाले आहेत किंवा मिळालेले होते.** यावरून हे निश्चित आहे की असे घडणे शक्य आहे. त्यामुळे ही गोष्ट आधी मनातून काढून टाका की हे सरकारचे काम नाही, किंवा ते शक्य नाही. हे पूर्णपणे सरकारचेच काम आहे आणि ते पूर्णपणे शक्य आहे.

जर एखादे सरकार या मूलभूत जबाबदाऱ्यांपासून पाठ फिरवत असेल, लोकसंख्या वाढीचा तर्क देऊन करून सर्व समस्यांचे खापर जनतेवर फोडत असेल, तर त्याला सरकार म्हणून सत्तेत राहण्याचा काही अधिकार नाही. **लोकसंख्या ही स्वतःहून काही समस्या नसते. असे असते तर हॉलंड, दक्षिण कोरिया, तैवान, सिंगापूर हे देश भारतापेक्षा गरीब असायला हवे होते कारण या देशांची लोकसंख्येची घनता भारतापेक्षा जास्त आहे, म्हणजेच प्रत्येक चौरस किलोमीटरमध्ये या देशांमध्ये भारतापेक्षा जास्त लोक राहतात.** परंतु या देशांमध्ये शिक्षण, आरोग्य, निवास, अन्न, पोषण इत्यादी सर्व बाबतीत भारतापेक्षा खूपच चांगली स्थिती आहे. तसेच या देशांकडे भारतासारखी अफाट आणि वैविध्यपूर्ण नैसर्गिक संपत्तीसुद्धा नाही. या देशांमध्येही भांडवली शोषण, लूट आणि विषमता आहे आणि आपल्यासाठी ते काही आदर्श नाहीत. **पण यावरून हे तर स्पष्ट होते की जर देशाच्या समस्यांना लोकसंख्याच जबाबदार असेल तर हे देश कमी विकसित आणि भारताच्या मागे असायला हवे होते. फक्त एवढ्या तथ्यानेच लोकसंख्येचा तर्क फेटाळला जाऊ शकतो.** लोकसंख्येचा तर्क देऊन सध्याची व्यवस्था तिच्या स्वत:च्या अपयशासाठी तुम्हाला जबाबदार बनवते, जेणेकरून या लोकविरोधी व्यवस्थेला कठड्यात उभे करण्याऐवजी आपण स्वतःला आणि एकमेकांना दोष देत रहावे.

**त्यामुळे वरील मागण्या समजून घ्या, त्या मागण्यांसाठी संघटित व्हा आणि संघर्ष**

**करा. इतर सर्व बाबी, धर्म, जात, प्रदेश, भाषा इत्यादींच्या भेदभावाला विसरून एकत्र या. भगतसिंह जनअधिकार यात्रा** याच उद्देशाने काढण्यात येत आहे.

**या यात्रेत तुम्ही सर्वांनी सहभागी व्हावे असे आम्ही मनापासून आवाहन करतो.** शहीद भगतसिंह यांच्या स्वप्नातील समाज घडवण्याच्या दिशेने हे पहिले पाऊल आहे. आपल्या पुढे एक लांब खडतर प्रवास आहे. परंतु मोठ्यातील मोठा प्रवास हा पहिल्या पायरीने सुरू होतो. हे पहिले पाऊल उचलण्यात आमची साथ द्या, आमच्या सोबत या आणि या यात्रेत सहभागी व्हा. तुमच्या गावात किंवा शहरातील यात्रेच्या तारखा आणि कार्यक्रमाबद्दल माहितीसाठी या पुस्तिकेच्या मागील बाजूस दिलेल्या फोन नंबर किंवा ईमेल पत्त्यांवर संपर्क करा.

**लढणार, जिंकणार!**
**शिक्षण आणि रोजगार-आमचा जन्मसिद्ध अधिकार!**
**अंधाराचे युग हटणार-जो लढणार तो जिंकणार!**
**इन्कलाब जिंदाबाद!**

# आर्थिक सहयोगाचे आवाहन

प्रिय साथींनो,


क्रांतिकारी जनकार्य हे जनतेच्या सहयोगाशिवाय शक्य नाही. भगतसिंह जनअधिकार यात्रा आम्ही जनसहयोगाच्या आधारावरच चालवत आहोत. तत्त्वाचा भाग म्हणून आम्ही कोणत्याही देशी-विदेशी फंडींग एजंसी, सरकारी संस्था, कोणताही निवडणूकबाज पक्ष, वा एखाद्या एन.जी.ओ. कडून फंड घेत नाही. म्हणून आम्ही देशातील सर्व न्यायप्रिय-प्रगतीशील नागरिकांना आवाहन करत आहोत की या यात्रेला जास्तीत जास्त शक्य तो सहयोग द्यावा.

**State bank of India**
**Raju yadav**
**A/C 32613719852**
**IFSC code SBI0001494**

Paytm, Gpay, phone pay Mobile no. **9455920657**

‘जेव्हा गतिरोधाची परिस्थिती लोकांना आपल्या कवेत घेते तेव्हा ते कोणताही बदल घडवण्यास कचरतात. हे जडत्व आणि निष्क्रियता मोडून काढण्यासाठी क्रांतिकारी भावना निर्माण करणे आवश्यक असते, अन्यथा अध:पतन आणि विध्वंसाचे वातावरण निर्माण होते. लोकांची दिशाभूल करणाऱ्या प्रतिगामी शक्ती जनतेला चुकीच्या मार्गावर नेण्यात यशस्वी होतात. यामुळे माणसाची प्रगती थांबते आणि गतिरोध निर्माण होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी क्रांतीचे चैतन्य जागवणे आवश्यक आहे, जेणेकरून मानवतेच्या आत्म्यात खळबळ निर्माण होईल.

- भगतसिंह



## आयोजक:

**नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना,**

महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन, **भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष**


**दिल्ली : योगेश - 9289498250, प्रियंवदा - 9693469694,**
**उत्तर प्रदेश : अमित-8858288593, अविनाश- 9891951393**
**महाराष्ट्र : परमेश्वर - 77983 64729, बबन - 96190 39793**
**हरियाणा : इंद्रजित - 8010156365, अजय - 8685030984**
**बिहार : अजीत - 6297974751, वारूणी - 7070571498**
**उत्तराखंड : कविता - 9971158783, अपूर्व - 7042740669**
**पंजाब - इंद्रजिन्दर - 9888080820, सुखविंदर - 9815705653**
**आंध्र प्रदेश : श्रीनिवास - 079958 28171, अरुणा - 085002 08259**
**चंडीगढ़ - शुभम 8196803093**

Central whatsapp Number : 9582712837 /bsjayatra